# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६६ दिनांक ०६/०७/२०२१

## पालघर जिल्हयात २ गुन्हयातील २ आरोपींविरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायद्याअंतर्गत कारवाई

### I] जिल्हयामध्ये जबरीने सोनसाखळया चोरणा-या टोळीविरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायद्याअंतर्गत खंबीर कारवाई

दिनांक १२/१०/२०२० रोजी रात्री १२.०५ वाजताचे सुमारास फिर्यादी वय-३८ वर्षे, हया तारापूर के. पी. नगर येथे स्वत:चे दुकानात असताना यातील एक आरोपी फिर्यादी यांचे दुकानात नाईटी खरेदी करण्याचे बहाण्याने गेला. सदर आरोपीने फिर्यादी यांचे गळयातील १० ग्रॅम वजनाचे सोन्याची चैन २५०००/- रुपये किमंतीची चैन जबरीने खेचून चोरुन त्याचे सोबत असलेल्या दुस-या आरोपी साथीदारासह त्यांचे ज्युपीटर स्कुटरसह पळुन गेले. नमुद घटनेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तारापूर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर I ४५/२०२० भा.दं.वि.सं. कलम ३९२,३४ प्रमाणे दिनांक-१२/१०/२०२० रोजी १४-३७ वाजता गुन्हा रजिस्टरी दाखल करण्यात आलेला आहे.

नमुद गुन्हयाचा तपास सुरु असताना, सदरचा गुन्हा टोळी प्रमुख आरोपी नामे- प्रशांत उर्फ राहुल गणेश पासवान वय-२४ वर्षे सध्या रा.दिपक संखे चाळ,कोळगाव, ता.जि.पालघर, मुळ रा.मलाटी,पो.टेनटा,पो.स्टे.मगदुमपुर,जि.जहानाबाद,रा.बिहार व त्यांचे इतर २ टोळी सदस्य यांनी केल्याचे निष्पन्न झाले. गुन्हयातील एका आरोपीस स्थानिक गुन्हे शाखा बोईसर युनिटचे पोलीस उप निरीक्षक श्री. आशिष पाटील व अंमलदार यांनी आरोपी यांचे मुळ राहते घरी मलाठी, पो. टेंहटा, पोलीस ठाणे, ता.मगदुमपुर, जि. जहानाबाद, राज्य-बिहार येथून अटक केली आहे.

**पालघर जिल्हयातील बोईसर, पालघर, मनोर, विरार, वालीव, डहाणू, तारापूर, वाडा या पोलीस स्टेशनमध्ये शस्त्रांचा धाक दाखवुन व मारहाण करून जबरी चोरी, वाहन चोरी, गंभीर दुखापती करणे, खुनाचा प्रयत्न करणे अशा प्रकारचे टोळी प्रमुख-प्रशांत उर्फ राहुल गणेश पासवान यांचेविरुध्द-११ व टोळीचा सदस्य क्र.२ यांचेविरुध्द- १९, असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. सन.२०१८ मध्ये सदर गुन्हेगारी टोळीचा प्रमुख प्रशांत उर्फ राहुल गणेश पासवान यास मा. सत्र न्यायालय पालघर यांनी एका जबरीचोरीच्या गुन्हयात सात वर्षे शिक्षा व १५०० दंड व दंड न भरल्यास ३ महिने कैद अशी शिक्षा सुनावली आहे.**

**नमुद संघटीत गुन्हेगारी टोळीकडून वर नमूद गुन्हयाव्यतिरिक्त २- चैनस्नॅचिंग, १-जबरीचोरी व ९- वाहन चोरीचे गुन्हे उघडकिस आले आहेत.**

**दिनांक-२२/०६/२०२१ रोजी मा. पोलीस अधीक्षक, पालघर श्री.दत्तात्रय शिंदे, यांनी या गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम ( MCOCA ) १९९९ चे कलम ३ (१) (ii), ३ (२) व ३ (४) ही कलम वाढ करणेबाबत मा. पोलीस उप महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, नवी मुंबई यांना प्रस्ताव सादर केला होता. मा.श्री.संजय मोहिते, पोलीस उप महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, नवी मुंबई यांनी त्यांचे कार्यालयीन आदेश जा.क्र. १४/वाचक/४५११/२०२१, दिनांक-०५/०७/२०२१ अन्वये सदर गुन्हयास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम ( MCOCA ) १९९९ चे कलम ३ (१) (ii), ३ (२) व ३ (४) ही कलमे समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम ( MCOCA ) १९९९ चे कलम २३(१) (अ) अन्वये पूर्व परवानगी दिलेली आहे.**

**श्री. दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर व श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली तारापूर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. I ४५/२०२० भा.दं.वि.सं.क. ३९२, ३४ सह महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे कलम ३ (१) (ii), ३ (२) व ३ (४) या गुन्हयाचा तपास श्री. विश्वास वळवी, उपविभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग हे करीत आहेत.**

---

## II] **<u>जिल्हयामध्ये जबरीने सोनसाखळया चोरणा-या टोळीविरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायद्याअंतर्गत खंबीर कारवाई</u>**

फिर्यादी हया दिनांक-१६/१०/२020 रोजी १६.३० वाजेच्या सुमारास फिर्यादी वय-५२ वर्षे, हया तारापूर, कुडण येथे स्वत:चे घरासमोर केलेल्या स्टॉलवर वडापाव विक्री करीत असतांना यातील आरोपी मजकुर यांनी आपसात संगनमत करुन एक आरोपी वडापाव घेण्याचे बहाण्याने फिर्यादी यांचे वडापाव विक्रीचे दुकानावर गेला. सदर आरोपीने फिर्यादीचे गळयातील १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र ३२,०००/- रुपये किंमतीचे जबरीने खेचुन चोरुन सोबत असलेल्या दुस-या आरोपी साथीदारासह त्यांचे काळया रंगाच्या मोटार सायकल वर बसुन पळुन गेले. नमुद घटनेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तारापूर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर I ४६/२०२० भा.दं.वि.सं. कलम ३९२,३४ प्रमाणे दिनांक-१६/१०/२०२० रोजी २२-२६ वाजता गुन्हा रजिस्टरी दाखल करण्यात आलेला आहे.

नमुद गुन्हयांचा तपास सुरु असताना, सदरचा गुन्हा टोळी प्रमुख आरोपी नामे- प्रशांत उर्फ राहुल गणेश पासवान वय-२४ वर्षे सध्या रा.दिपक संखे चाळ,कोळगाव, ता.जि.पालघर, मुळ रा.मलाटी,पो.टेनटा,पो.स्टे.मगदुमपुर,जि.जहानाबाद,रा.बिहार व त्यांचे इतर २ टोळी सदस्य यांनी केल्याचे निष्पन्न झाले. गुन्हयातील एका आरोपीस स्थानिक गुन्हे शाखा बोईसर युनिटचे पोलीस उप निरीक्षक श्री. आशिष पाटील व अंमलदार यांनी आरोपी यांचे मुळ राहते घरी मलाठी, पो. टेंहटा, पोलीस ठाणे, ता.मगदुमपुर, जि. जहानाबाद, राज्य-बिहार येथून अटक केली आहे.

**पालघर जिल्हयातील बोईसर, पालघर, मनोर, विरार, वालीव, डहाणू, तारापूर, वाडा या पोलीस स्टेशनमध्ये शस्त्रांचा धाक दाखवुन व मारहाण करून जबरी चोरी, वाहन चोरी, गंभीर दुखापती करणे, खुनाचा प्रयत्न करणे अशा प्रकारचे टोळी प्रमुख-प्रशांत उर्फ राहुल गणेश पासवान यांचेविरुध्द-११ व टोळीचा सदस्य क्र.२ यांचेविरुध्द- १९, असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. सन.२०१८**

मध्ये सदर गुन्हेगारी टोळीचा प्रमुख प्रशांत उर्फ राहुल गणेश पासवान यास मा. सत्र न्यायालय पालघर यांनी एका जबरीचोरीच्या गुन्हयात सात वर्षे शिक्षा व १५०० दंड व दंड न भरल्यास ३ महिने कैद अशी शिक्षा सुनावली आहे.

नमुद संघटीत गुन्हेगारी टोळीकडून वर नमूद दोन गुन्हयाव्यतिरिक्त २- चैनस्नॅचिंग, १- जबरीचोरी व ९- वाहन चोरीचे गुन्हे उघडकिस आले आहेत.

दिनांक-२२/०६/२०२१ रोजी मा. पोलीस अधीक्षक, पालघर श्री.दत्तात्रय शिंदे, यांनी या गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम ( **MCOCA** ) १९९९ चे कलम ३ (१) (**ii**), ३ (२) व ३ (४) ही कलम वाढ करणेबाबत मा. पोलीस उप महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, नवी मुंबई यांना प्रस्ताव सादर केला होता. मा. श्री.संजय मोहिते, पोलीस उप महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, नवी मुंबई यांनी त्यांचे कार्यालयीन आदेश जा.क्र. १४/वाचक/४५१२/२०२१, दिनांक-०५/०७/२०२१ अन्वये सदर गुन्हयास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम ( **MCOCA** ) १९९९ चे कलम ३ (१) (**ii**), ३ (२) व ३ (४) ही कलमे समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम ( **MCOCA** ) १९९९ चे कलम २३(१) (अ) अन्वये पूर्व परवानगी दिलेली आहे.

श्री. दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर व श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली तारापूर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. I ४६/२०२० भा.दं.वि.सं.क. ३९२, ३४ सह महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे कलम ३ (१) (**ii**), ३ (२) व ३ (४) या गुन्हयाचा तपास श्री. विश्वास वळवी, उपविभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक पालघर, यांचे सुचनेप्रमाणे श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.विश्वास वळवी, उप विभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग, सपोनि/जाधव, तारापुर पोलीस ठाणे, पोउपनि/आशिष पाटील, स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस अमंलदार यांनी केली आहे.